# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | DECEMBER 2023 | No. 11


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**यशया ९ : १-६**

१) तथापि आतां ज्या भूमीत विपत्ति आहे तेथे हा अंधकार राहणार नाही. त्यांने मागील काळी जबुलून प्रांत व नफताली प्रांत यांची अप्रतिष्ठा केली तरी पुढील काळी समुद्रतीरीचा प्रदेश, यार्देनेच्या पलीकडील प्रांत विदेशी लोकांचे मंडळ (गलील) यांची तो प्रतिष्ठा करील.

२) अंधकारांत चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे; मृत्युच्छायेच्या प्रदेशांत बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे.

३) तूं राष्ट्राची वृद्धि केली आहे; त्याला महानंद प्राप्ति करुन दिली आहे; हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदाप्रमाणे, लूट वाटून घेणाऱ्या लोकांच्या आनंदाप्रमाणें, तें तुजसमोर आनंद करितात.

४) कारण मिद्यानाच्या दिवसाप्रमाणे, तूं त्याच्या भारचें जूं, त्याच्या खांद्यावरची काठी, त्याजवर जुलूम करणाऱ्यांचा सोटा मोडिला आहे.

५) युद्धाच्या गर्दीत जोडे घातलेल्या योद्धांचे जोडे व रक्तानें भरलेली वस्त्रे ही जाळण्यासाठी अग्नीला सर्पण झाली आहेत.

६) कारण आम्हीसाठी बाल जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे. त्याच्या खांद्यावर सत्ता राहील; त्याला अद्भुत मंत्री; समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणातील.

# राजपुत्राची भेट

## THE GIFT OF THE PRINCE!



(रेव्ह. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी)

अगदि लहानपणापासून, ख्रिस्त जन्मदिनाबद्दल माझ्या मनांत नेहमीच एक विशेष स्थान रहात आलेले आहे. ते मनाला अवर्णनिय आनंद देते. मी तरुण असताना आमच्याकडे नविन कपडे किंवा भेट वस्तू खरेदि करण्यासाठी, किंवा रंगी-बेरंगी कागदांनी किंवा दिव्यांनी घर सुशोभित करण्याकरिता पैसे नसत. आम्ही एका छोट्याशा घरात, मर्यादित अन्नासहित रहात होतो, तरी देखील आमचे आई-वडिल आमचे जीवन सुंदर आणि अर्थभरीत करण्याकरिता प्रयत्नशील असत. मी आणि माझा भाऊ त्यांच्या प्रयत्नांबद्दल सदैव ऋणी आहोत. ते दिवस अतिशय अद्भुत असे होते. आश्चर्यकारक असे होते! आजी-आजोबांची भेट घेणे, नातेवाईकांना भेटणे, डोळ्यांवर झोपेची धुंदि असून सकाळी लवकर उपासनेला जाणे, सर्व नातेवाईकांच्या सह दुपारचे रुचकर सहभोजनाची वाट पहाणे, खेळ खेळणे आणि आपापसात क्षुल्लक कारणांवरुन भांडणे या सर्व गोष्टिमुळे ते दिवस अतिशय सुंदर आणि आनंदाचे होते.

आता देखील, प्रत्येक वर्षी मेणबत्त्यांचा प्रकाश, फराळाचा सुगंध, लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या माळा आणि थंडगार वारा, आणि अंत:करणास उब देणाऱ्या कॅरलस्, या सर्व गोष्टि आठवणींना उजाळा देत आहेत.

तरी देखील कांहि जणांकरिता ख्रिस्त जन्मदिन एक वेगळा अनुभव असु शकतो. आपल्या मध्ये आता सोबत नसलेल्या प्रियजनांच्या वियोगाच्या आठवणींमुळे तणावग्रस्त परिस्थितीचा

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

REACHING NATIONS



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF

Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

GENERAL MANAGER

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

ADMINISTRATION

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

EDITORIAL BOARD

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers



10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

E.MAIL

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


**"माझ्या जिवानें तुझी कास धरिली आहे;
तुझा उजवा हात मला संभाळून धरितो."**
(स्तोत्र - ६३:८)

प्रभुमधील अति प्रिय बंधु आणि बहिणींनो!

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्यां अतुल्य नामात शुभेच्छा व्यक्त करितो.

**एको ऑफ हिज कॉल मासिक आणि यूट्युब सेवा.**

आमच्या एको ऑफ हिज कॉलच्या मासिक वाचकांद्वारे आणि युट्युब चॅनलच्या प्रेक्षकांद्वारे आम्हाला प्राप्त होत असलेल्या सकारात्मक प्रतिक्रियाबद्दल आम्ही देवाचे आभार मानित आहोत. तुम्ही दररोज पहाटे २ वाजेपासून सुरुवात होत असणाऱ्या पाच मिनिटांचे इंग्रजी, हिन्दी, तामिळ आणि तो लगु भाषांमध्ये भाषांतरीत होत असलेले संदेश ऐकावित यासाठी उत्तेजन देत आहोत. या विशिष्ट कारणाकरीता आमचा दूरध्वनि क्रमांक ९८४१०७१८५८ तुमच्या मोबाईल मध्ये राखून ठेवा. आणि **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलचे वर्गणीदार बना अशी विनंती करीत आहोत. त्याचप्रमाणे माझ्याशी थेट संपर्क साधण्याकरिता ९८४१२७१८५८ हा दूरध्वनी क्रमांक देखील राखून ठेवा. या सेवा पूर्णपणे नि:शुल्क आहेत.

जगभरातील तरुण मुले, मुली आणि लहान लेकरांच्या कल्याणाकरिता एक मिनिटांची प्रार्थना करण्याकरीता आम्ही Global Vision for Youth and Kid Care हि चळवळ सुरु केली आहे. या सेवेमध्ये जगभरातून अनेक मित्रांनी नावे नोंदविली आहेत. **ज्या सर्वांनी नावे नोंदविली आहेत त्यांनी दररोज रात्री १० वाजता (त्यांच्या स्थानिक वेळेनुसार) खालील प्रार्थना करावी. यासाठी उत्तेजन देत आहोत.**



*प्रभु येशु ख्रिस्तासोबत तरुण प्रौढ आणि लेकरे*

**प्रिय देवा, आम्ही आमच्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामामध्ये प्रार्थना करीत आहोत, की तूं जगातील सर्व तरुण मुले, मुली आणि लहान लेकरे यांचे स्मरण करावे आमेन.**

या प्रार्थनेचा परिणाम, अनेक तरुण प्रौढ आणि लेकरे येशू ख्रिस्ताकरीता साथ देण्यासाठी तयार होत आहेत. सर्व मान महिमा आणि गौरव केवळ आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताला. आमेन

तुम्ही तुमच्या लेकरांची नावे आम्हाला दिली तर आम्ही त्याच्या करीता प्रार्थना करु. या बदलयात कृपया कोणत्याहि प्रकारे दान पाठवू नये.

आमच्या सेवाकार्यात अतिशय समर्पितपणे सेवाकरणाऱ्या अनेक सहकाऱ्यांना विविध आजारांनी ग्रासले आहे आणि त्यांना पुष्कळशी हानी सोसावी लागली आहे. आमच्या सर्व देवाच्या सेवकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या संरक्षणाकरीता आणि कल्याणाकरीता प्रार्थना करण्याची विनंती करीत आहोत.

या वर्षी नुतन वर्षाची आमची उपासना ३१ डिसेंबरच्या रात्री १० वाजेपासून आमच्या युट्युब चॅनलवर प्रसारीत केली जाईल. तुम्ही तुमच्या स्थानिक मंडळीत उपासनेस उपस्थित रहाण्याकरिता उत्तेजन देत आहोत. तुमच्या मंडळीच्या उपासनेत उपस्थित रहाणे अतिशय महत्त्वाचे आहे.

नवीन वर्षातील आशीर्वाद सभा २ जानेवारी २०२४ पासून ७ जानेवारी २०२४ पर्यंत दररोज सकाळी ६ वाजता घेण्यात येईल.

आम्ही **एको ऑफ हिज कॉल** मासिक पोस्टा द्वारे पाठवित आहोत, ते सर्वांपर्यंत पोहंचत नाहि याची आम्हाला कल्पना आहे. आमचे प्रत्येक कार्यक्रम तुमच्यापर्यंत पोहंचावेत याकरिता कृपया तुमचा वॉटस ॲप क्रमांक आणि ईमेल आम्हाला कळवा.

डिसेंबर महिन्यासाठी आम्ही अनेक सेवांचे आयोजन केले आहे; त्या कोणत्याहि अडखळणाशिवाय यशस्वी व्हाव्यात यासाठी प्रार्थना करा.

तुम्हा सर्वांना ख्रिस्त जन्म दिनाच्या शुभेच्छा; आणि नूतन वर्षाकरिता विशेष शुभेच्छा!

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि**

**ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858,

E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

असु शकतो. कांहि जण शरिर स्वास्थाच्या तक्रारींशी किंवा आर्थिक समस्यांशी झगडत असतील, काहिजण ख्रिस्त जन्मदिनाच्या घाई गडबडीत दडपून गेल्यामुळे, एकटेपणा, दु:ख किंवा निराशा जाणवत असेल. असे सांगण्यात येते कि या दिवसात आत्महत्येंच्या प्रमाणात वाढ होते.

त्यात ख्रिस्त जन्मदिन २५ डिसेंबर रोजी साजरा करावा कां? आणि येशू ख्रिस्ताच्या जन्माची हिच तारीख आहे का? असा वाद सध्या सुरु आहे. माझ्याकरीता, येशूचा जन्म कोणत्या तारखेस झाला हे महत्त्वाचे नसून त्याने या जगात जन्म घेतला हे महत्त्वाचे आहे, आणि ते अधोरेखीत टाळता न येणारे सत्य आहे.

त्यामुळे, मी जी महान भेट मला प्राप्त झाली ती म्हणजे येशूचा जन्म सर्व जगताला जाहिर करण्याची संधी घेत, माझ्या जीवनातील परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हा सण मला माझ्या कुटुंबासहित व मित्रमंडळीसहित साजरा करणे आवडते. ज्यांना कुटुंब नाहि किंवा जे कठीण अशा परिस्थितीमधून जात आहेत अशांना देखील सहभागी करण्याचा मी पराकाष्टेचे प्रयत्न करीते. हि वेळ इतरांना प्रेम देण्याची, काळजी घेण्याची आणि माझ्याजवळ जे आहे ते वाटण्याची आहे.

ख्रिस्ती जन्मदिन सणात एक दृष्टिकोण नेहमीच पहावयास मिळतो, तो म्हणजे भेटवस्तू देणे आणि स्विकारणे. या सणात आपल्या लेकरांकरीता नवीन कपडे आणि आपल्या प्रियजनांवर आपले प्रेम आहे, त्यांची काळजी आहे आणि त्यांच्या सोबत आनंद करु इच्छितो हे दर्शविण्याकरिता काहितरी विशेष वस्तू खरेदी करण्याकरिता आपला कल असतो. पाश्चिमात्य देशात ख्रिसमससाठी खरेदी करण्याची सुरुवात ऑगस्ट महिन्या पासूनच होते. भेटवस्तू देणे स्विकारणे ह्या परंपरेला, ख्रिसमस सणात इतके महत्त्व दिले जाते, कि मानवजातीला अगोदरच देण्यात आलेली भेट - 'येशूचा' जन्म तो साजरा करण्याचा विसर पडतो.

## येशूचा जन्म आपल्याला पाच महत्त्वाची बक्षिस / भेटी देतो :

### १) अभिवचन परिपूर्तीची भेट :-

ख्रिस्त येशूचा जन्म आपला देव हा वचन पाळणारा देव आहे यांची आपल्याला आठवण करुन देतो. तो जे कांही बोलतो, ते तो करणार त्याने लबाडी करावी किंवा मन बदलावे असा तो कांही मनुष्य नाही. ते पूर्ण होण्यास थोडा अवधी लागेल कदाचीत कांही पिढ्याचा परंतु ते नेहमीच कायम रहाते. पवित्रशास्त्र मत्तय २४:३५ या वचनात म्हणते, "**आकाश व पृथ्वी ही नाही तशी होतील; परंतु माझी वचने नाही तशी होणारच नाहीत.**" आपण बहुतेकदा कांही आठवड्यांनी, महिन्यांनी किंवा वर्षांनी सहजपणे बोलतो ते सोडून देतो. एक गोष्ट आपण लक्षात ठेविली पाहिजे, ती म्हणजे देव जेव्हा कांही बोलतो, ते तो करणारच. ते कदाचीत आपल्या आयुष्याकाळात किंवा आपल्या लेकरांच्या काळात घडू शकते. देवाने यहुदी लोकांना मशिहा देण्याचे अभिवचन दिल्याप्रमाणे त्याने तो पाठविला!

बायबलचे आभ्यासक असे म्हणतात, कि येशू ख्रिस्ताच्या जन्मासहित जुन्या करारात दिलेली जवळ-जवळ ४४ अभिवचने पूर्ण झाली. उदा. उत्पत्ति ३:१५ या वचनात मशिहा हा स्त्री पासून जन्माला येईल असे भविष्य वर्तविण्यात आले होते, त्याची



*आम्ही चांगली मुले आहोत*

पूर्तता मत्तय १:२० या वचनात झाली. त्याच्या जन्माच्या जागे विषयीचे अभिवचन (मिश्वा ५:२, मत्तय २:१) पूर्ण झाले. आणखीन यादी जोडू शकतो कारण अशी अनेक अभिवचने देण्यात आली होती जी पूर्ण झाली, परंतु महत्त्वाची बाब समजण्याची गरज आहे, ती ही की, अभिवचनांची पूर्तता पहाण्यासाठी देवाच्या लोकांना अनेक वर्षी वाट पाहावी लागली.

देवाच्या प्रिय लेकरांनो, देवानें एखादे अभिवचन दिले असेल तर, विश्वासाने प्रार्थना करीत राहा सोडून देवू नका. तुम्हाला कदाचीत पाऊस किंवा वारा दिसणार नाही, तरी तुमचे खंदक पाण्याने भरुन जातील. येशू जेव्हा होय म्हणतो तेव्हा कोणालाही 'नाही' म्हणता येणार नाही! तो दिलेले अभिवचन पाळणारा आहे! जरी काही घडत असलेले दिसत नसेल तरी देखील विश्वासात स्थिर रहा. देव जे कांही बोलला ते तो घडवून आणील.

घडताना काही दिसत नसले; तरी देव आपल्यावतीने अजूनही त्यावर कार्य करीत

आहे हे आठवण्याचा ख्रिसमसचा समय आहे.

त्याच्या समयात सर्व कांही सुंदर घडून येईल. त्याच्या वेळेची वाट पाहात राहा! त्याची वेळ ही परिपूर्ण वेळ आहे. ''सर्व काही शक्य आहे''. अलीशिबा, मरिया,शिमोन आणि हन्ना यांच्या प्रमाणे स्वाधीन होऊन वाट पहात राहा. त्या सर्वांनी धीराने वाट पाहिली आणि देवाचे अभिवचन पूर्ण झालेले पाहिले.

## २) शांतिची भेट :

देवाकडून दिली जाणारी महान भेट, तो देत असलेली शांति. त्याचे नांव शांतिचा अधीपति! शांति हा आपल्या जीवनाचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. तरी त्याची जाणीव होत नसेल किंवा तिचा स्विकार केला नसेल. शांति असल्याशिवाय कशालाच अर्थ उरत नाही. आपल्याकडे फार मोठे घर, महागडी मोटार गाडी, गडगंज पगाराची नोकरी, सहचाऱ्याकडून बक्षिस, धनवान पती, ईश्वरी देणगी असलेली लेकरे, हे सर्व असले परंतु शांति नसेल तर आपल्याकडे असलेल्या कशाचाही उपयोग नाही.

एकदा माझी एका तरुणाशी भेट झाली आणि त्याच्या बोलण्याने मी चक्रावून गेले, त्याने मला म्हटले ''मला रडत एका मोठ्या घरात रहाण्यापेक्षा, एका छोट्याशा घरात सुखाने रहाणे आवडेल.'' त्याचे ऐकून माझे मन भरुन आले. हा समाज ज्या मध्ये आपण जीवन जगत आहोत आपण दुसऱ्यांवर छाप पाडण्याकरीता जगतो. दुसऱ्यांनी आपल्याला यशस्वी आणि वजनदार असे पहावे आणि आपल्या दिखावू संपत्तीकडे पाहून मोजमाप करावे. परंतु आंतरिक संपत्ति जी शांति तिचे काय?

येशू म्हणतो, मी देत असलेली शांति सर्वपरिस्थितीसाठी, तुमची बँकेतील जमा १० अंकी असो किंवा एक अंकी असो, तुम्हाला कुटुंब असो किंवा तुम्ही एकटे अहात, तुम्ही सुदृढ प्रकृति लाभले अहात किंवा तुमचे भविष्य डॉक्टर आणि औषधांवर आहे, तुम्ही पुरुष आहा किंवा स्त्री, तरुण किंवा वृद्ध. त्यामुळे कांही फरक पडत नाही. येशू म्हणतो, **''अहो कष्टी व भाराक्रांत जनहो तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हाला विश्रांति देईन. मी तुम्हांस शांति देतो, जग ती देवू शकत नाही.''** (यो १४:२७). देव देतो ती शांति आपल्या समजण्याच्या, आपल्या कल्पनाशक्तिच्यापलीकडे आहे. दानिएलाने गर्जणाऱ्या सिंहाच्या मध्ये अनुविलेली, इब्री बंधुंनी अग्नीच्या तप्त भट्टीत अनुभविलेली, ती शांति.

येशू देतो ती अमर्याद शांति. वादळांत देखील ती अनुभवता येते, कारण सर्व परिस्थिती त्याच्या नियंत्रणात असते. देवाच्या परवानगी असल्या शिवाय आपल्याला असावयास हवी. तो आपल्याला लज्जीत होऊ देणार नाही.

प्रिय मित्रांनो, तुम्ही कदाचित तुमच्या जीवनात रुक्ष अशा स्थितीतून जात असाल, कदाचित सध्या हानिकारक वावटळ परिस्थिती अनुभवित असाल, परंतु मला तुम्हाला सांगू द्या, की अशा स्थितीतून मी एकदा नाही तर अनेकदा गेलेली आहे, आज मी येशू काल; आज आणि सर्वदा सारखाच असलेला पाहिला आहे.

त्याने नेहमीच मला त्यांच्या शांतिने भरले. तुम्ही आज कोणत्याहि स्थितित असाल, कोणत्याहि परिस्थितीला सामोरे जात असाल, कोणत्याहि धोकादायक स्थितीत असाल किंवा गल्याथाला सामोरे जात असाल येशू तुम्हाला शांति देईल. कारण तो शांतिचा अधीपति आहे.

पहिला ख्रिसमस हा प्रत्यक्षात महान आणि शांतिमय सोहळा नव्हता याची तुम्हाला कल्पना आहे कां? येशूच्या जन्माची बातमी ऐकून कांहीजण घाबरुन गेले होते. ते भयभीत झाले होते आणि गोंधळून गेले होते. अशावेळी, ते भ्याले होते तरी देखील विश्वासूजन होते त्यांनी बातमी ऐकताच आनंद व्यक्त केला. देवदूताने जेव्हा मेंढपाळांना दर्शन दिले, तो त्यांना म्हणाला, **''भिऊ नका.... जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो.''** (लुक २:१०) ते साधे भोळे आणि साधा विश्वास असणारे लोक होते.

आणखीन एक गोष्ट आहे, जी आपली शांति भंग करते. द्वेष आणि क्षमा न करण्याची प्रवृत्ती. यामुळे मला (विल्यम ब्लेक) यांची एक कविता आठवते.

**'विषाचे झाड'**

*मी माझ्या मित्रांवर क्रोधित झालो होतो;*
*मी क्रोधाला सांगितले, आणि क्रोध निवळला.*
*मी माझ्या शत्रूवर क्रोधित झालो.*
*मी त्याला सांगितले नाही, तेव्हा माझा, क्रोध वाढला*
*भीतीने मी त्यावर पाणी घातलें,*
*रात्र-दिवस माझ्या अश्रुनी*

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 54 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

Certificate in Ministry
Diploma in Theology

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ डिसेंबर ते १८ जानेवारी २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

१९ डिसेंबर : सर्व कमनशिबी लोकांच्या गरजा पुरवित असलेल्या आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज, थियॉलॉजीकल अभ्यास क्रमा**करीता.

२० डिसेंबर : आमच्या सर्व भाषांतरकार, सहसंपादक, समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

२१ डिसेंबर : मिशनकार्य सेवकांच्या समर्पितपणाबद्दल.

२२ डिसेंबर : आमच्या सर्व समर्पित कर्मचारी वर्गावर आशीर्वादांची वृष्टि केल्याबद्दल.

२३ डिसेंबर : सर्व दुष्ट शक्तिंपासून आमच्या वरिष्ट पाळकांचे आणि त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित ठेविल्याबद्दल.

२४ डिसेंबर : **नहेम्या बायबल कॉलेज**चे २रे सत्र यशस्वीरित्या पूर्ण होऊ दिल्याबद्दल.

२५ डिसेंबर : या वर्षभरातील आमचे सर्व ख्रिस्ती कार्यक्रम आशीर्वादीत केल्याबद्दल.

२६ डिसेंबर : आमच्या सर्व १६ भाषेतील मासिकांना नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल.

२७ डिसेंबर : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनाचे भागीदार आणि त्यांच्या कुटुंबांना दया दर्शविल्याबद्दल.

२८ डिसेंबर : आमच्या पत्र व्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या बायबलकोर आणि थियॉलाजीकल अभ्यासक्रमातील विद्यार्थी संख्येत वाढ झाल्याबद्दल.

२९ डिसेंबर : आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये मासिक छापून ते मिशन क्षेत्रांमध्ये पाठविणे शक्य होऊ दिल्याबद्दल.

३० डिसेंबर : या वर्षभरात **नहेम्या बायबल कॉलेज** सुरळीत सुरु राहिल्याबद्दल.

३१ डिसेंबर : २०२३ सालातील सेवा कार्यातील सर्व गरजा आश्चर्यकारकरित्या पुरविल्याबद्दल.

०१ जानेवारी : सर्व वाचक वर्ग आणि जगभरातील लोकांना शांति दिल्याबद्दल.

०२ जानेवारी : २०२४ सालाकरीता सर्व मंडळ्यांतील विश्वासणाऱ्यांना चांगली अभिवचने दिल्याबद्दल.

०३ जानेवारी : सर्व ख्रिस्ती संस्था आणि मंडळ्यांना संपूर्ण २०२३ सालात आशीर्वाद दिल्याबद्दल.

## प्रार्थने करीता मुद्दे

०४ जानेवारी : तरुणांमधील हिंसाचार आणि खून यांचे समुळ उच्चाटन होऊन ते पवित्र आत्म्याने भरले जावेत.

०५ जानेवारी : कुटुंबामध्ये शांति नांदावी.

०६ जानेवारी : जगभरातील सर्व पुढारी दैवी शहाणपणाने भरले जावेत, आणि त्यांनी लोकांच्या कल्याणार्थ कार्य करावे.

०७ जानेवारी : जगभरातील व्यक्तिंच्या उत्पन्नात वाढ व्हावी.

०८ जानेवारी : जगभरातील सर्व ख्रिस्ती शिक्षण संस्थांची प्रतिष्ठा राखली जावी.

०९ जानेवारी : ख्रिस्तीजनांनी देवाचे वचन अनुसरावे व ख्रिस्तासारखे स्वभावगुण प्रदर्शीत करावे.

१० जानेवारी : सर्व देशांमध्ये शांति असावी आणि आर्थिक उन्नति व्हावी.

११ जानेवारी : २०२४ सालात पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांचे कुटुंबियांवर देवाचा वरदहस्त असावा.

१२ जानेवारी : मंडळ्यां दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित रहाव्यात.

१३ जानेवारी : सर्व ख्रिस्ती मंडळ्यांची आणि संस्थांची सरकारी कायद्यानुसार नोंदणी व्हावी.

१४ जानेवारी : आमच्या संस्थेकरीता योग्य कर्मचारी उपलब्ध व्हावेत.

१५ जानेवारी : आमच्या सेवा कार्यातील भागीदर आणि सर्व प्रादेशीक समन्वयक त्यांच्या कार्यात यशस्वी व्हावेत.

१६ जानेवारी : आमच्या वरिष्ट पाळकांचे आत्मचरित्र्य लिहून पूर्ण व्हावे.

१७ जानेवारी : आमच्या सेवा कार्यात वाढ व्हावी आणि जगभरात सुवार्ता प्रसार व्हावा.

१८ जानेवारी : या महिन्यातील गरजां पुरविल्या जाव्यात.

(पान ४ वरुन)

*स्मित हास्याने त्याला प्रभावित केले*
*धुर्त-कपटाने तेजीत केले.*
*एक तेजस्वी सफरचंद होईपर्यंत ते वाढले,*
*आणि शत्रूने ते चमकताना पाहिले,*
*आणि त्याला कळले, ते माझेच आहे.*
*माझ्या बागेत चोरिच्या हेतूने शिरला,*
*पहाटेच्या उजेडात पाहून मला आनंद झाला;*
*माझा शत्रू झाडाखाली स्वस्थपणे बसलेला पाहिला.*
*हि कविता नेहमीच माझी आवडती आहे.*

आपण क्षमा करुया आणि पुढे जाऊया तेव्हाच आपल्याला शांति मिळेल. आपण जर अंत:करणात अक्षमाशीलता राखून ठेविली तर, शांति आपल्याला चकविल होय, लोक कदाचित आपल्याशी चुकीचे वागले असतील, दु:ख - यातना दिल्या असतील किंवा पाठीत सुरा खुपसला असेल. देवाला त्यांच्याकडे बघू द्या.

कदाचित तुम्ही कोणाला तरी क्षमा करण्याचे राहून गेले असेल; तर आताच वेळ आहे. एक संदेश लिहून पाठवा, किंवा समेट घडावा यासाठी फोन करा. असे करण्यास देव तुम्हाला शांति देवो.

## ३) त्याच्या उपस्थितीची भेट!

देवाकडून मिळणारी तिसरी भेट - त्याची उपस्थिती ओहो! किती आश्चर्यकारक भेट! त्यांचे नाव 'इम्यानुएल' म्हणजे 'आम्हांबरोबर देव'. त्याने आम्हांस कदापी न सोडण्याचे आणि न त्यागण्याचे अभिवचन दिले आहे. **''तुझ्या सानिध्यात पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातांत सौख्य सदोदित आहेत.''** (स्तोत्र १६:११) दाविद राजाला जीवनात- धन, मान, अधिकार, विजय हे सर्व मिळाले होते, वरील सर्व असताना देखील एक गोष्ट तो इच्छित होता. ती म्हणजे त्यांच्या महालात राहाण्यापेक्षा देवाच्या उपस्थितीत राहाण्यास

येशू म्हणतो, मी देत असलेली शांति सर्व परिस्थितीसाठी, तुमची बँकेतील जमा १० अंकी असो किंवा एक अंकी असो, तुम्हाला कुटुंब असो किंवा तुम्ही एकटे अहात, तुम्ही सदृढ प्रकृति लाभले अहात किंवा तुमचे भविष्य डॉक्टर आणि औषधांवर आहे, तुम्ही पुरुष आहा किंवा स्त्री, तरुण किंवा वृद्ध त्यामुळे कांही फरक पडत नाही. येशू म्हणतो, **''अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या म्हणजे मी तुम्हाला विश्रांति देईन.''** **''मी तुम्हांस शांति देतो, जग ती देवू शकत नाही.''** (यो १४:२७) देव देतो ती शांति आपल्या समजण्याच्या, दानिएलाने गर्जनाऱ्या सिंहाच्या मध्ये अनुभविलेली, इब्रीबंधुंनी अग्नीच्या तप्त भट्टीत अनुभविलेली, ती शांति.

येशू देतो ती अमर्याद शांति. वादळांत देखील त्याची अनुभवता येते, कारण सर्व परिस्थिती त्याच्या नियंत्रणात असते. देवाच्या परवानगी असल्याशिवाय आपल्याला काही स्पर्श करु शकणार नाही. अशी खात्री आपल्याला असावयास हवी. तो आपल्याला लज्जीत होऊ देणार नाही.



**त्यांची उपस्थिती म्हणजे आनंदच**

प्रिय मित्रांनो, तुम्ही कदाचित तुमच्या जीवनात रुक्ष अशा स्थितीतून जात असाल, कदाचित सध्या हानिकारक वावटळ परिस्थिती अनुभवित असाल, परंतु मला तुम्हाला सांगू द्या, की अशा स्थितीतून मी एकदा नाही तर अनेकदा गेलेली आहे, आणि मी येशू काल, आज आणि सर्वदा सारखाच असलेला पाहिला आहे.

त्याने नेहमीच मला त्यांच्या शांतिने भरले. तुम्ही आज कोणत्याहि स्थितित असाल, कोणत्याहि परिस्थितीला सामोरे जात असाल, कोणत्याहि धोकादायक स्थितीत असाल किंवा गल्याथाला सामोरे जात असाल. येशू तुम्हाला शांति देईल. कारण तो शांतिचा अधीपति आहे.

पहिला ख्रिसमस हा प्रत्यक्षात महान आणि शांतिमय सोहळा नव्हता यांची तुम्हाला कल्पना आहे कां? येशूच्या जन्माची बातमी ऐकून कांहीजण घाबरुन तीव्रतेने इच्छित होता - ती म्हणजे त्याच्या महालात राहण्यापेक्षा देवाच्या उपस्थित रहाणारा दावीदाकडून पाप घडले, तेंव्हा त्याला त्याच्या प्रतिष्ठे

(...पान ८ वर)


# नहेम्या बायबल सायं कॉलेज
## चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

REACHING NATIONS

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**Certificate in Ministry**
**Diploma in Theology**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## परमेश्वर ऐकतो आणि मुक्त करितो!

THE LORD HEARS AND DELIVERS!


**''धार्मिक धावा करितात, तो ऐकून परमेश्वर त्यांना त्यांच्या सर्व संकटांपासून मुक्त करितो'' (स्तोत्र ३४:१७)**

मला माझ्या पाळकीय सेवेच्या सुरुवातीच्या दिवसात, माझे उत्पन्न कमी असल्यामुळे साधी जीवनशैली जगावी लागत होती. एकदा सकाळच्या उपासनेत माझे वरिष्ठ पाळकांनी, पास्टर जी. सुंदरम यांनी पुढील रविवारी विशेष उपासना पेरियार थीडल हॉलमध्ये होईल असे जाहिर केले. त्यावेळी माझ्याकडे उपासना मंदिराच्या बाहेर असलेल्या पादात्रणे ठेवण्याच्या स्टॅण्ड सांभाळण्याची सेवेची जबाबदारी होती. मी माझ्याकडे असलेल्या कपड्यांतील एक चांगला कपड्याचा जोड धुवून रविवार करीता तयार ठेविला.

त्याच्या अगोदरच्या शुक्रवारी एक तरुण मला येऊन भेटला व म्हणाला की तो माझ्या एका मित्राचा भाऊ आहे. मला त्याने दोन दिवस माझ्या घरात राहू देण्याची विनंती केली, आणि मी त्याला माझ्या बरोबर राहण्याची परवानगी दिली. माझ्या जुन्या मित्राच्या भावाला मदत करण्यास मिळाल्याचा मला आनंद वाटला.

तथापि मला आश्चर्य वाटले, दुसऱ्या दिवशी (शनिवारी) मी घरात नसताना, त्याने माझे सर्व जुने-नविन कपडे, ज्या मध्ये रविवार करीता धुवून ठेविला कपड्याचा जोड देखील होता, त्याशिवाय माझ्या काहि किमती वस्तू घेऊन तो पळून गेला.

उद्भवलेल्या परिस्थितीबद्दल मला अतिशय वाईट वाटले कारण रविवारसाठी कपडे विकत घेण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते. अस्वच्छ कपडे परिधान करुन पादत्राणाचे स्टॅंड सांभाळण्याची जबाबदारी पार पाडणे मला मान्य नव्हते; कारण माझे वरिष्ठ पाळक कपडे परिधान करण्या बाबतीत आणि टापटिपपणाबद्दल अतिशय कडक होते. मी अतिशय दु:खीत होतो आणि देवाकडे वळलो, या आशेने कि कपडे खरेदी करण्यासाठी थोडी तरी मदत मिळेल. माझा विश्वास जरी डळमळला, तरी त्या शनिवारच्या दुपारच्या समयी देवावर त्याने चमत्कार घडवून आणण्याकरिता विश्वास ठेवल्या शिवाय दुसरा पर्याय नव्हता.



अचानक, मला माझ्या घराच्या बाहेरुन हांक मारीत असल्याचे ऐकू आले. मी बाहेर गेलो आणि त्याला घरात घेतले. त्याच्या हातात पांढऱ्या कपड्यांनी भरलेली एक पिशवी होती. त्याने ती पिशवी मला देत म्हटले; ''बंधु सॅम सहा महिन्यांपूर्वी माझा एक नातेवाईक परदेशातून पुष्कळसे पांढरे पॅन्ट-शर्ट घेऊन आला होता. ते माझ्या शरिराच्या मापाचे नसल्यामुळे, मी ते तुला देण्याचा विचार करीत होतो, कारण ते तुला व्यवस्थीत मापाचे होतील. कपडे परदेशी कापडाने शिवलेले आणि माझ्या मापाचे होते, ते पाहून माझे मन कृतज्ञतेने आणि आनंदाने भरुन गेले.

दुसऱ्या दिवशी, सकाळी त्यापैकी एक जोड घालून मी उपासनेला गेलो. पास्टर जी. सुंदरम यांनी मजकडे वर-खाली नजर टाकून म्हटले, **''बंधु सॅम, आज तुम्ही अगदी निटनिटके तयार झालेला आहात!''** मी अगदी थोडक्यात त्यांना घडलेले आणि देवाने कसा आशीर्वाद दिला हे सांगितले ते देखील आनंदीत झाले आणि माझ्या पाठीवर थाप मारुन त्यांच्या नेहमीच्या ईश्वरी पद्धतीने सहमती दर्शविली. देवाची स्तुती असो.

स्तोत्र ३४:९ वचनात म्हटल्यानुसार, **''धार्मिकाला बहुत कष्ट होतात, तरी परमेश्वर त्या सर्वांतुन त्याला सोडवितो.''**

(पान ६ वरुन...)

पेक्षा पवित्र आत्म्याच्या उपस्थितीची चिंता होती. जो म्हणाला **''तूं मला आपल्यापुढून घालवून देऊं नको आणि आपला पवित्र आत्मा मजमधून काढून घेऊ नको.''** (स्तोत्र ५१:११).

येशू स्वर्गात (त्याच्या घरी) जाण्या अगोदर म्हणाला, **''मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांस दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईन; त्याने तुम्हांबरोबर सदासर्वदा रहावें म्हणून.''** (योहान १४:१६) आज आपण स्वत:ला प्रश्न विचारु या, आपल्या जीवनात, आपल्या जीवनात, आपल्या कुटुंबात, आपल्या घरात, आणि आपल्या पति-पत्नीच्या नात्यात देवाची उपस्थिती आहे कां? आपण देवाच्या उपस्थितीला प्राधान्य देत आहोत की जगाच्या उपस्थितीला? या ख्रिस्त जन्मदिनाच्या मोसमात स्वत:ला प्रश्न विचारु या.

### ४) देवाच्या सामर्थ्याची भेट :

राजपुत्राची आणखीन एक भेट त्याचे आपल्या जीवनात प्रचंड सामर्थ्य येशू जन्म हि

उत्पत्ति ३:१५ या वचनातील अभिवचनाची पूर्वता. ''**तूं व स्त्री, तुझी संतति व तिची संतति यामध्ये मी परस्परवैर स्थापीन, ती तुझे डोके फोडील व तूं तिची टांच फोडशील.**''

हे वचन सैतान आणि मानवजातीतील वैर सिद्ध करते. येशूच्या जन्माने सैतानाकडे असलेले सर्व अधिकार पूर्णतया नष्ट केले. सैतानाने देवाची दैवी योजना उधळून लावण्याकरिता स्वर्गीय हेतू नष्ट करण्यासाठी. येशूच्या जन्माच्या समयी जन्मलेल्या बाळाची कत्तल केली. त्याची योजना निष्फळ ठरली. कारण देवाची योजना नष्ट करता येत नाहि. प्रिय लेकरांनो, तुमच्या आणि माझ्याकरीता असलेली देवाची योजना कोणालाही नष्ट करता येत नाही. जरी तुमची सध्याची परिस्थिती जसे सुचवीत असली, आठवण करा, यशयाने यशया ६:१ या वचनात ''**देवाला उच्चस्थळी असलेल्या उच्च सिंहासनावर बसलेले पाहिले.**'' आपला देव आपल्या पावलांना मार्ग दाखवितो आणि समुद्राच्या लाटांना त्यानी मर्यादा घालून देतो. ''माझा हेतु स्थिर राहील.'' आपला प्रभु अधिकारात सामर्थी आणि भयावह असा आहे.

आपण आपल्या परिस्थितीवर अपयशावर पराजयवर, पापावर, शापावर आणि सर्वाधिक सैतानावर विजयी असावे अशी इच्छा व्यक्त करतो. माघार घेऊ नका. आपण जेत्यापेक्षा अधिक आहोत, अशी आठवण ख्रिस्त जन्मदिन करुन देत आहे. अलिशेबाने शापावर विजयी मिळविला मरीयाने सामाजिक कलंकावर विजय मिळविला आणि मानव वंशाने पाप आणि सैतान यावर विजय मिळविला.

तुम्ही कशाकरिता थांबला आहात? लक्षात ठेवा आपण जेत्यापेक्षा अधिक आहोत!



*Forgiveness of Jesus Christ*

## ५) क्षमेची भेट :

देवाने जगाची निर्मिती केल्यानंतर शेवटी त्याने पाहिले कि सर्व चांगले आहे, सुंदर आहे आणि परिपूर्ण आहे. तथापि आज्ञाभंगाच्या द्वारे झालेल्या पापाच्या प्रवेशाने सर्वकाही बदलले.

आज्ञाभंगाने पाप आणले आणि तेव्हा पासून मानवजात पाप आणि त्याच्या परिणामांवर मात करण्यासाठी धडपडत आहे. आणि हि सर्वसाधारण कल्पना सर्वच धर्मात उपस्थित आहे - पहावयास मिळते. बायबल असे विधान करते कि ''**पापाचे वेतन मरण आहे.**'' (रोम ६:२३). दुसऱ्या शब्दात, आपल्या पापमय कृत्यांचा परिणाम हा शारिरीक मृत्युपर्यंतच मर्यादीत नाही, तर आत्मिक मृत्यु देखील. पापाने आपल्याला देवापासून विभक्त केले आणि त्याच्या व आपल्यामध्ये दरी निर्माण केली. तथापि ख्रिस्ताच्या जन्माने तो दुरावा-विभक्तपणाचा शेवट केला. येशू ख्रिस्ताचा या जगात जन्म घेण्याचा उद्देश, आपल्या पापांकरीता प्राण अर्पण करावा आणि आपली शिक्षेची जागा स्वत: घ्यावी. क्रुसावर असे करण्याद्वारे येशूने आपल्याला ''कृपा'' हि विशेष अशी भेट दिली. ख्रिस्त जन्मदिन हा गरीबाची देवाचे नि:स्वार्थी प्रेम जे त्याच्या कृपे स्वरुप आहे. त्या आठवणीचा समय आहे. येशू आपल्याकरिता सतत मध्यस्ति करीत आहे जसे रोम ८.३४ या वचनात विदित केले आहे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे, कि असे कोणतेहि पाप कृपेपेक्षा मोठे नाही जे त्यावर आच्छादन झालू शकत नाही, किंवा कोणतेही पाप इतके लहान-छोटे नाही कि कृपेला कार्य करता येत नाही.

प्रिय मित्रांनो, या जगाची दडपणे, प्रत्येक दिवसाच्या गरजा आणि ज्या आवाहानांना आपण सामोरे जातो त्या आपल्याला काहीवेळा देवापासून दूर करतात. जर तुम्ही जाणीव होत देवापासून दूर गेलेला आहात असे जाणवत असेल, तर आता त्याच्या जवळ परत जवळ येण्याची हिच वेळ आहे.

येशूचे आपल्यावर प्रेम आहे आणि तो आपल्याला क्षमा करु इच्छितो. त्याची इच्छा आहे कि आपण त्याच्याशी वैयक्तिक नाते जोडावे.

प्रिय मित्रांनो, माझी प्रार्थना आहे, कि हा ख्रिस्त जन्मदिन तुम्हाकरीता अर्थपूर्ण असा व्हावा. राजपुत्राच्या पांचहि भेटींचा तुम्ही लाभ घ्यावा. माझी प्रार्थना आहे तुम्ही कधीही विसरु नये की तो समय कितीही लागो अभिवचने पाळणारा देव आहे. तो वादळात देखील शांति देणारा आहे. त्याची शांति नेहमीच आपल्या बरोबर असणार, जरी आपल्याला ती दिसत नसली किंवा जाणवत नसली. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत तो आपल्या बरोबर असणार. तो सामर्थ्यशाली देव असल्यामुळे आपल्याला भिती बाळगण्याचे कारण नाही. तो आपल्याला केवळ विजयीच करणार असे नाही, तरी जेत्यापेक्षा अधिक करील. सरते शेवटि, तो तुम्हाला जसे तुम्ही आहात तसेच तुमचा स्विकार करुन तुम्हाला त्याच्या बाहुत घेण्यास वाट पाहत आहे.

राजपुत्राच्या पांच भेटींचा तुम्ही स्विकार कराल तर ख्रिस्त जन्माचा खरा अर्थ तुम्हाला समजेल.

हा ख्रिस्त जन्मदीन तुम्हां सर्वांना अतिशय सुखाचा, आशीर्वादाचा आनंदाचा आणि अर्थपूर्ण जावो!


## WANTED for

**NEHEMIAH BIBLE COLLEGE**
**of ECHO OF HIS CALL, Chennai**
**(ATA Candidate)**

1. **DEAN (Residential):** Hindi Theologian with M.Div. / M.Th. Degree & experience.
2. **VICE-PRINCIPAL:** English / Tamil / Hindi Theologian with M.Div. / M.Th. & experience.
3. **CO-ORDINATOR:** With Computer / Typing knowledge in English, Tamil & Hindi.

Eligible candidates may send bio--data to:
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98410 71858



## ग्रंथालयाकरिता पुस्तकांची गरज

आम्हाला आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल व नहेम्या बायबल कॉलेज**च्या ग्रंथालयाकरिता तामिल, इंग्रजी आणि हिन्दी भाषिक पुस्तकांची गरज आहे. तुमच्याकडे नवी किंवा जुनी (चांगल्या अवस्थेत) पुस्तके असतील आणि ती तुम्ही देणगी म्हणून देवू इच्छित असाल तर कृपया आमच्याशी संपर्क साधा.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/- आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th DECEMBER 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**